"

# मुंबई विद्यापीठ

APD/ICD/2016-17/299
विद्याविषयक नियोजन
आणि विकास विभाग,
फोर्ट, मुंबई – ३२
३ ऑक्टोंबर, २०१६

परिपत्रक:

**विषय: १५ ऑक्टोंबर रोजी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याबाबत.**

संदर्भ: शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण उच्च व तंत्र शिक्षण महाराष्ट्र शासन यांचे पत्र दि. २५ सप्टेंबर, २०१६.

महोदय/महोदया,

वरिल संदर्भिय पत्रान्वये असे सुचित करण्यात येते की, भारताचे माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना सार्थ आदरांजली अर्पण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने गेल्या वर्षीपासून (२०१५) डॉ. कलाम यांचा जन्मदिवस **(१५ ऑक्टोंबर)** हा **"वाचन प्रेरणा दिन"** म्हणून साजरा करण्याचे घोषित केले. त्यानुसार गेल्या वर्षी पहिला वाचन प्रेरना दिन संपुर्ण महाराष्ट्रात मोठया उत्साहाने, अभूतपूर्व प्रतिसादासह आणि अत्यंत उत्तम पध्दतीने संपन्न झाला.

वाचन प्रेरणा व संस्कृतीचा विकास ही एक सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. **याही वर्षी (२०१६) आपल्याला वाचन प्रेरणा दिन उत्साह आणि गांभीर्यासह साजरा करायचा आहे.** ज्ञानसंपन्न व माहितीसमृध्द समाजाची घडण, व्यक्तिमत्व विकास, साहित्य विकास आणि भाषाविकास यांसाठी वाचन संस्कृतीचा विस्तार आणि विकास करणे अत्यावश्यक आहे. म्हणूनच वाचन प्रेरणा दिनासारखे उपक्रम योजणे गरजेचे आहे.

तरी आपल्या महाविद्यालयात **दि. १५ ऑक्टोंबर, २०१६** रोजी **"वाचन प्रेरणा दिन"** विविध उपक्रमानी साजरा करावा. हया दिवसानिमित्त वैविध्यपुर्ण, कार्यक्रम आपल्या कल्पना शक्तीनुसार नावीन्यपूर्ण आणि अभिनव उपक्रम आयोजित करावेत असे आवाहन मा. उच्च व तंत्र शिक्षण तसेच मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री यांनी केले आहे. उपस्थितांचा (विद्यार्थी/रसिक वाचकांचा सहभाग) हे सूत्र कार्यक्रम आयोजीत करताना लक्षात ठेवावे. सदर कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे स्वतंत्र अहवाल विद्यापीठास सहायक कुलसचिव, विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग, मुंबई – ४०० ०३२ येथे सादर करावा. सोबत उपक्रम सूची जोडली आहे.

मुंबई – ४०० ०३२
दि.३ ऑक्टोंबर, २०१६

3/10/16
डॉ. एम. ए. खान
कुलसचिव

प्रत रवाना:– प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, संचालक/विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, यांच्या माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

उपकुलसचिव, (जनसंपर्क अधिकारी), मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२, यांच्या माहितीकरिता प्रत रवाना

(मा.मंत्री महोदयांच्या दि.२८ सप्टेंबर, २०१६ च्या पत्राचे सहपत्र)

## वाचन प्रेरणा दिन

## स्व. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन - दि. १५ ऑक्टोबर


### संभाव्य कार्यक्रम

१. व्याख्यान (वाचन प्रेरणा किंवा वाचन संस्कृतीशी संबंधित विषयावर).
२. चर्चासत्र / परिसंवाद / कार्यशाळा (वाचन प्रेरणा किंवा वाचन संस्कृतीशी संबंधित विषयावर).
३. लेखकांशी त्यांच्या लेखनाविषयी, त्यांच्या कलाकृतींविषयी चर्चा किंवा त्यांची प्रकट मुलाखत.
४. सुसंगत स्पर्धा (निबंध स्पर्धा किंवा काव्यवाचन स्पर्धा किंवा अभिवाचन स्पर्धा... इत्यादी).
५. विद्यार्थ्यांनी किंवा वाचकांनी आवडत्या पुस्तकाविषयी आणि लेखकाविषयी लेखी किंवा तोंडी मनोगत व्यक्त करणे.
६. वाचन कौशल्याचा विकास या विषयावरील प्रशिक्षण व सादरीकरण.
७. वृत्तपत्रांतील अग्रलेख / प्रमुख लेखांचे वाचन.
८. ई- बुक्सचे सामूहिक वाचन.
९. निवडक कथा, कविता आणि उतारे यांचे अभिवाचन.
१०. एखाद्या सुप्रसिद्ध पुस्तकातील महत्त्वाच्या / निवडक पानांचे सामूहिक वाचन (पारायण).
११. प्रकाशक / वितरक / ग्रंथालये यांच्या सहकार्याने पुस्तकांचे प्रदर्शन.
१२. **संकल्प** – महिन्यातील एक दिवस ' **नो गॅजेट डे**' म्हणून कृतीत आणण्याचे आवाहन. (' नो गॅजेट डे'- मोबाईल, व्हॉटस्अॅप, फेसबुक, ट्विटर न वापरता तो वेळ वाचनासाठी देणे.)
१३. सलग काही वेळ (शांतपणे, एकट्याने) वाचनाचा उपक्रम (विद्यार्थी / वाचक एखाद्या वर्गात / सभागृहात बसून एकट्याने पुस्तक वाचतील.)
१४. वाढदिवशी एकमेकांना पुस्तक भेट देण्याचे आवाहन.
१५. वाचन प्रेरणा दिनाचे निमित्त साधून विद्यार्थ्यांनी / नागरिकांनी एकमेकांना पुस्तक भेट द्यावे.
१६. शाळा, महाविद्यालय, ग्रंथालय व इतर संस्थांनी आपल्या परिसरात **'डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम वाचन कट्टा'** निर्माण करावा.
१७. **पुष्पगुच्छ नाही पुस्तक** (बुके नाही बुक) - सार्वजनिक कार्यक्रमांत पाहुण्यांना पुष्पगुच्छांऐवजी पुस्तक भेट देण्याच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी व प्रसार.
१८. वाचन प्रेरणा दिनाच्या बोधचिन्हाचा (लोगोचा) सोशल मीडियाद्वारे आणि रंगीत छापील प्रती काढून प्रसार.

---

**टीप** : आपण ठरविलेल्या कार्यक्रमाची माहिती आणि कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर कार्यक्रमाचा छायाचित्रांसह अहवाल **vinodtawdeminister@gmail.com** या ई-पत्त्यावर किंवा पत्रात नमूद कार्यालयीन पत्त्यावर जरुर पाठवावा.


महाराष्ट्र शासन
१५ ऑक्टोबर
वाचन
प्रेरणा दिन
भारतरत्न
डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम
ज यं ती


महाराष्ट्र शासन
१५ ऑक्टोबर
वाचन
प्रेरणा दिन
भारतरत्न
डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम
ज यं ती


महाराष्ट्र शासन
१५ ऑक्टोबर
वाचन
प्रेरणा दिन
भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती